# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रसिद्धीपत्रक

- **मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते “ध्वजारोहण” समारंभ संपन्न**

दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न झाला. सर्वप्रथम काशीमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास तसेच फाटक रोड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर मा. आयुक्त यांच्या हस्ते महापालिका मुख्य कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास व स्वातंत्र्य सैनिक स्मारकास पुष्पहार अर्पण करुन वंदन करण्यात आले.

मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से) यांच्या हस्ते मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय येथे "ध्वजारोहण" करुन मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना स्वांतत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. महापालिका कर्मचाऱ्यांनी देशभक्तीपर गीत गाऊन शहिदांना मानवंदना दिली. मा. आयुक्त यांच्या हस्ते शहीद मेजर कौस्तुभ राणे यांचे वीरपिता प्रकाश राणे आणि स्वातंत्र्यसैनिक मुरलीधर होळकर यांचा सन्मान करण्यात आला. तद्नंतर उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी "तिरंगा प्रतिज्ञा" घेतली.

मिरा-भाईंदर शहरातील स्वच्छता व सुंदरता कायम ठेवण्यासाठी सगळ्या नागरिकांनी सहकार्य करावे; जेणेकरून स्वच्छतेत मिळालेला पहिल्या क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार टिकवण्यात आपल्या सगळ्यांनाच यश मिळेल असे मा. आयुक्तांनी संबोधित करताना सांगितले.

सदर समारंभा प्रसंगी अति. आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त श्रीम.कविता बोरकर, शहर अभियंता दिपक खांबीत, नगरसचिव वासुदेव शिरवळकर, कार्यकारी अभियंता (पा.पु. व मल:) शरद नानेगांवकर, सहा. संचालक नगररचना पुरषोत्तम शिंदे, सिस्टम मॅनेजर तथा माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार घरत तसेच महानगरपालिका विभागप्रमुख, अधिकारी/कर्मचारी वर्ग, अग्निशमन जवान, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक बलाचे जवान, शालेय शिक्षक व शाळकरी विद्यार्थी, पत्रकार बंधू व उपस्थित होते.